महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९१२३९१४
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : एचएमआर-१६२१/प्र.क्र.१२१/२०२३/जाहिरात जाहिरात क्रमांक : ११२/२०२५

# दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट-क मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा - २०२३

शासनाच्या गृह विभागाच्या अधीनस्त राज्य उत्पादन शुल्क विभागातील लिपिक संवर्ग व जवान संवर्गातील कर्मचा-यांना दुय्यम निरीक्षक, गट-क पदावर निवडीद्वारे नियुक्ती देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट-क मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा - २०२३ फक्त **मुंबई** येथे **संगणक प्रणालीवर आधारित (Online)** पद्धतीने आयोजित करण्यात येईल. प्रस्तुत परीक्षेचा दिनांक स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात येईल.

**२. अर्ज सादर करण्याची प्रक्रिया/कालावधी:-**

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | अर्ज सादर करण्याचा कालावधी | **दिनांक १० जून, २०२५ रोजी १४.०० ते दिनांक ३० जून, २०२५ रोजी २३:५९** |
| २ | ऑनलाईन पद्धतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | **दिनांक ३० जून, २०२५ रोजी २३:५९** |
| ३ | भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक | **दिनांक ०२ जुलै, २०२५ रोजी २३:५९** |
| ४ | चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | **दिनांक ०३ जुलै, २०२५ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये** |

**३.** प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील पदांचा व इतर तपशील खालीलप्रमाणे आहे:-

**३.१** वेतनश्रेणी :- S-१२ : रुपये ३२०००-१०१६००

**३.२** पदसंख्या :- **एकूण पदे - १३७**

| प्रवर्ग | जवान संवर्ग | लिपिक संवर्ग | एकूण पदे |
|---|---|---|---|
| अराखीव | **११५ पदे** | **२२ पदे** | |
| दिव्यांग | **एकूण ११५ पदांपैकी ०५ पदे दिव्यांग व्यक्तिंसाठी आरक्षित**<br>**(१) २ पदे** - कुष्ठरोग मुक्त (Leprosy Cured)<br>**(२) ३ पदे** - विशिष्ट शिक्षण अक्षमता (Specific Learning Disability) / मानसिक आजार (Mental Illness) तसेच एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणारे | **एकूण २२ पदांपैकी ०१ पद दिव्यांग व्यक्तिंसाठी आरक्षित**<br>**१ पद** - कुष्ठरोग मुक्त (Leprosy Cured) | १३७ पदांपैकी ०६ पदे दिव्यांग व्यक्तिंसाठी आरक्षित |

**३.३** वर नमूद पदसंख्येमध्ये शासनाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**३.४** मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ च्या अंतिम न्याय निर्णयाच्या अधीन राहून गुणवत्तेनुसार पदे भरण्यात येतील.

**४. पात्रता :-**

**४.१** महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या अधिनस्त **केवळ** राज्य उत्पादन शुल्क विभागातील लिपिक संवर्ग व जवान संवर्गातील खालील पदावरील कर्मचारी प्रस्तुत परीक्षेस पात्र असतील :-

**लिपिक संवर्ग :-** लिपिक, वरिष्ठ लिपिक, लिपिक-टंकलेखक, टंकलेखक, लेखापाल व टिप्पणी सहायक

**जवान संवर्ग :-** जवान, जवान-नि-वाहनचालक, पेटी आफिसर, सहायक दुय्यम निरीक्षक

**४.२ शैक्षणिक अर्हतेसह सेवा:-** शासन परिपत्रक/जाहिरातीमध्ये नमूद **अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास (दिनांक ३० जून, २०२५ रोजी)** लिपिक संवर्गामध्ये किंवा जवान संवर्गामध्ये नियमित नियुक्तीच्या दिनांकापासून खालीलप्रमाणे किमान नियमित सेवा पूर्ण होणे आवश्यक आहे:-

**४.२.१** मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या कोणत्याही शाखेचा पदवीधर असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत - **३ वर्षे नियमित सेवा.**

**४.२.२** महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची एच.एस.सी.परीक्षा उत्तीर्ण किंवा महाराष्ट्र शासनाने एच.एस.सी. च्या समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता, अशा उमेदवारांच्या बाबतीत - **५ वर्षे नियमित सेवा.**

**४.२.३** महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण किंवा महाराष्ट्र शासनाने एस.एस.सी.च्या समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता, अशा उमेदवारांच्या बाबतीत - **७ वर्षे नियमित सेवा.**

**४.३ शारीरिक अर्हता:-**

**(एक)** दुय्यम निरीक्षक संवर्गाकरीता शिफारसपात्र ठरण्यासाठी उमेदवारांकडे उपरोक्त अर्हतेसोबत खालीलप्रमाणे किमान शारीरिक अर्हता असणे आवश्यक आहे:-

| संवर्ग | पुरुष | महिला |
|---|---|---|
| दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क | (१) उंची - किमान १६५ सें. मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>(२) छाती - किमान ७९ से.मी. आणि फुगवून त्यापेक्षा ५ से.मी. जास्त. | (१) उंची - किमान १५५ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>(२) वजन- किमान ५० कि.ग्रॅ. |

**(दोन)** प्रस्तुत पदावर नियुक्तीकरीता शिफारस झालेल्या उमेदवारांची शारीरिक मोजमापे नियुक्ती करण्यापूर्वी शासनामार्फत सक्षम प्राधिकाऱ्याकडून तपासून घेण्यात येतील. विहित शारीरिक पात्रता नसल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी अपात्र ठरेल.

४.४ लिपिकवर्गीय कर्मचा-यांसाठी असलेली सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा/विभागीय परीक्षा उत्तीर्ण न झालेले अथवा सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट दिलेली नाही, असे कर्मचारी प्रस्तुत परीक्षेस अर्ज सादर करण्यास पात्र नाहीत. जवान संवर्गीय कर्मचाऱ्यांसाठी अशी परीक्षा नसल्यामुळे ते परीक्षेस बसण्यास पात्र असतील.

४.५ परीक्षेच्या दिनांकास विभागीय चौकशी प्रलंबित असलेले लिपिक संवर्ग अथवा जवान संवर्गातील कर्मचारी परीक्षेस बसण्यास पात्र असतील. परंतु त्यांची निवड झाल्यानंतर चौकशीमध्ये दोषी आढळल्यास ते नियमानुसार दुय्यम निरीक्षक पदावर कारवाईसाठी पात्र ठरतील.

**५. आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी :-**

**५.१ दिव्यांग आरक्षण :-**

**५.१.१** दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ, दिनांक २९ मे, २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

**५.१.२** प्रस्तुत परीक्षेमधून भरण्यात येणा-या दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट-क संवर्गाकरीता शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक: एमआयएस-१०२०/प्र.क्र.११७/राउशु-१, दिनांक २९ जुलै, २०२१ अन्वये खालीलप्रमाणे दिव्यांग व्यक्तींसाठी सुनिश्चिती करण्यात आली आहे :-

(1) LC , (2) SLD,MI , (3) MD involving into (1) and (2)

**५.१.३** दिव्यांग व्यक्तींची संबंधित संवर्ग/पदाकरीता पात्रता शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**५.१.४** संबंधित दिव्यांगत्वाच्या प्रकारचे किमान ४०% दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र धारक उमेदवार / व्यक्ती आरक्षण तसेच नियमानुसार अनुज्ञेय सोयी / सवलतीसाठी पात्र असतील.

**५.१.५** लक्षणीय दिव्यांगत्व असलेले उमेदवार / व्यक्ती खालील सवलतींच्या दाव्यास पात्र असतील:-

(१) दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद लक्षणीय दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित असल्यास नियमानुसार अनुज्ञेय आरक्षण व इतर सोयी सवलती.

(२) दिव्यांगत्याचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद संबंधित दिव्यांग प्रकारासाठी सुनिश्चित केले असल्यास नियमानुसार अनुज्ञेय सोयी-सवलती

**५.१.६** दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM या संगणकीय प्रणालीद्वारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

**५.१.७** शासन परिपत्रक, दिव्यांग कल्याण विभाग क्रमांकः दिव्यांग-2024/प्र.क्र.86/दि.क.2. दिनांक 27 जून 2024 अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक 14 सप्टेंबर, 2018 च्या शासन निर्णयान्वये भविष्यात वेळोवेळी स्थापन करण्यात आलेल्या येणाऱ्या वैद्यकीय मंडळामार्फत दिव्यांगत्व प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्र (UDID Card) प्राप्त करुन घेणे अनिवार्य आहे. वैश्विक ओळखपत्र (UDID Card) प्राप्त करुन घेण्यासाठी नोंदणी केल्यानंतर प्रत्यक्षात सदर ओळखपत्र प्राप्त होईपर्यन्तच्या कालावधीसाठी दिल्या व्यक्तीना दिव्यांगत्वाच्या सवलती योजनांचा लाभ घेण्यासाठी त्यांचेकडे असलेले दिव्यांगत्व प्रमाणासोबत वैश्विक ओळखपत्रासाठीचा नाव नौदणी क्रमांक (Enrollment Number) सादर करणे अनिवार्य राहील

**५.१.८** महाराष्ट्र शासनाच्या उपरोक्त नमूद दिनांक २७ जून, २०२४ रोजीच्या परिपत्रकाद्वारे दिव्यांग व्यक्तींना आरक्षणासह सर्व सुविधा व लाभ मिळण्यासाठी केंद्र शासनाच्या स्वावलंबन पोर्टलवरुन वितरित केलेले दिव्यांग प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्र (UDID Card) आयोगाद्वारे आयोजित सर्व पदभरतीकरीता अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला असून याबाबत दिनांक २१ एप्रिल, २०२४ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्धिपत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे.

**५.१.९** सदर शासन परिपत्रकास अनुसरुन आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीमधील उमेदवारांच्या खात्यामध्ये दिव्यांग उमेदवारांचा वैश्विक ओळखपत्र क्रमांक नोंद करण्याची तसेच दिव्यांग उमेदवारांनी त्यांच्या खात्यामध्ये दिलेला दिव्यांगत्वाचा तपशील केंद्र शासनाच्या स्वावलंबन पोर्टलवरुन विधि (Validate) करुन घेण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**५.१.१० दिव्यांग तपशील विधिग्राह्य होण्याकरीता दिव्यांग उमेदवारांना पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक असेल :-**

(१) स्वावलंबन पोर्टलवरुन वितरित दिव्यांग प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्र क्रमांक अशा दोन्ही बाबी उपलब्ध असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी सदर दोन्ही तपशील नोंदविणे आवश्यक आहे.

(२) ज्या उमेदवारांकडे सद्यस्थितीत स्वावलंबन पोर्टलवरून वितरित केलेले दिव्यांग प्रमाणपत्र नाही. तथापि राज्य शासनाच्या SADM पोर्टलवहन वितरित करण्यात आलेले दिव्यांग प्रमाणपत्र आहे, अशा उमेदवारांनी SADM प्रमाणपत्रासह वैश्विक ओळखपत्रासाठी नोंदणी केल्याचा क्रमांक (Enrolment Number) नोंदविणे अनिवार्य असेल, तथापि, सदर उमेदवारांना मुलाखतीपूर्वी वैश्विक ओळखपत्र सादर करणे आवश्यक असेल.

(३) उमेदवारांनी खात्यामधील दिव्यांगत्वाचा सर्व आवश्यक तपशील अचूकपणे नोंदवावा दिव्यांगत्वाचा तपशील नोंदविताना तो दिव्यांग प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्रावर नमूद केल्याप्रमाणेच असल्याची खात्री करावी उदा. दिव्यांग प्रमाणपत्र क्रमांक, दिव्यांगत्वाची टक्केवारी, वैश्विक ओळखपत्र क्रमांक, वैश्विक ओळखपत्र वितरणाचा दिनांक इत्यादी तपशील वैश्विक ओळखप्रमाणेच असणे आवश्यक आहे.

(४) दिव्यांगत्वाचा सर्व तपशिल अचूकपणे नोंदविल्यानंतर 'Validate या बटनवर क्लिक करावे.

(५) उमेदवाराचे वैश्विक ओळखपत्रावर नमूद नाव दिव्यांगत्याचा प्रकार व दिव्यांग स्थिती (कायमस्वरुपी/तात्पुरतें) इत्यादी तपशील दर्शविले जाईल व सदर तपशील अचूक असल्याचे उमेदवाराने संबंधित बटनवर क्लिक करुन प्रमाणित केल्यानंतर तपशील विधिग्राहा करण्याची प्रक्रिया पूर्ण होईल.

(6) दिव्यांग तपशील विधिग्राह्य होण्याची प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण होण्यासाठी उमेदवाराच्या खात्यामध्ये नमूद जन्मदिनांक व वैश्विक ओळखपत्राकरीता नमूद जन्मदिनांक एकच असणे तसेच दिव्यांगत्वाचा सर्व तपशहज अचूकपणे नोंदविणे आवश्यक आहे.

**५.१.११** लक्षणीय दिव्यांगत्व असणाऱ्या उमेदवारांना अर्जामध्ये नमूद केलेला दिव्यांगत्वाचा प्रकार/ उपप्रकार बदलणे अनुज्ञेय नाही.

**६. परीक्षा योजना :-**

**६.१ परीक्षेचे टप्पे :- एक - लेखी परीक्षा**

**६.२ परीक्षेचे स्वरुप :- वस्तुनिष्ठ बहुपर्यायी**

**६.३ प्रश्नपत्रिका :- दोन**

**६.४ एकूण गुण :- २००**

६.५ प्रस्तुत परीक्षेची परीक्षा योजना व सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या संकेतस्थळावरील “ **Candidate Information > Examination > Syllabus of Examination या** सदराखाली उपलब्ध आहे.

**६.६** लेखी परीक्षेतील एकूण गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवड करण्यात येईल.

**७. निवडप्रक्रिया :-**

**७.१** जाहिरातीमध्ये नमूद अर्हता/पात्रतेविषयक अटी किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार शिफारशीसाठी पात्र असणार नाही.

**७.२** सेवा भरतीची संपूर्ण प्रक्रिया शासन पत्र, गृह विभाग, क्रमांक इएसटी-१७२१/प्र.क्र.१७८/राऊशु-१, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२३ तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागातील दुय्यम निरीक्षक (सेवाप्रवेश) नियम, २००९ व दिनांक १२ जुलै, २०१६ रोजीची सुधारणा अथवा तदनंतर शासनाकडून वेळोवेळी करण्यात येणा-या सुधारणा तसेच आयोगाकडून वेळोवेळी सुधारण्यात येणाऱ्या कार्यनियमावलीतील तरतुदींनुसार राबविण्यात येईल .

**७.३** लेखी परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या एकूण गुणांच्या आधारे लिपिक सवंर्ग आणि जवान संवर्गातून अर्हताप्राप्त ठरणाऱ्या उमेदवारांकरीता गुणवत्ताक्रमानुसार सामाईक यादी तयार करण्यात येईल.

**७.४** भरती प्रक्रियेदरम्यान अंतिम शिफारस यादी/निवड यादी तयार करताना समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांचे क्रमांकन/प्राधान्य क्रमवारी(Ranking) आयोगाच्या दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकानुसार निश्चित करण्यात येईल.

**८. भरती प्रक्रियेतून बाहेर पडणे (Opting out option) :-**

**८.१** पदाच्या/संवर्गाच्या अंतिम शिफारशीपूर्वी सर्वसाधारण गुणवत्ता यादी (General Merit List) तसेच तात्पुरती निवड यादी (Provisional Selection List) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**८.२** तात्पुरती निवड यादीच्या आधारे भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (ऑप्टिंग आऊट) पर्याय सादर करण्यासाठी संबंधित उमेदवारांना ७ दिवसांचा कालावधी देण्यात येईल.

**८.३** आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे उमेदवारांकडून प्राप्त " भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे " हा पर्याय लक्षात घेऊन अंतिम शिफारस यादी तयार करण्यात येईल.

**८.४** पदभरतीकरीता भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे याबाबतची कार्यवाही फक्त आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे विहित कालावधीमध्ये करणे अनिवार्य आहे. यासंदर्भातील इतर कोणत्याही पद्धतीने केलेल्या तसेच नंतरच्या टप्प्यावर पर्याय रद्द करण्यासंदर्भात केलेल्या विनंतीचा विचार केला जाणार नाही.

**९. शिफारस :-**

**९.१ "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना "** मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार उमेदवारांच्या शिफारसी संबंधित विभागाकडे पाठविण्यात येईल.

**९.२** लेखी परीक्षेमधून शिफारसपात्र होण्याकरिता शतमत (Percentile) पध्दत लागू आहे. प्रस्तुत परीक्षेमध्ये सर्वाधिक गुण मिळविणा-या उमेदवारांच्या **एकूण गुणांच्या ३५ शतमत,** तसेच दिव्यांग उमेदवारांच्या बाबतीत **एकूण गुणांच्या २० शतमत** एवढे किमान गुण प्राप्त करणारे उमेदवार शिफारशीसाठी पात्र असतील .

**९.३** शिफारस झालेल्या उमेदवारांची नावे आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

**१०. परीक्षेकरीता अर्ज करण्याची पध्दत :-**

**१०.१ अर्ज सादर करण्याचे टप्पे :-**

**१०.१.१** आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रमाणालीवर यापुर्वी विहित पद्धतीने नोंदणी केली नसल्यास नोंदणी करून खाते (Profile) तयार करणे.

**१०.१.२** खाते तयार केलेले असल्यास व ते अद्ययावत करण्याची आवश्यकता असल्यास अद्ययावत करणे.

**१०.१.३** विहित कालावधीत तसेच विहित पध्दतीने खालीलप्रमाणे लागू असेल त्याप्रमाणे आवश्यक कागदपत्रे अपलोड करुन अर्ज सादर करणे .

**१०.१.४** परीक्षा शुल्काचा भरणा विहित पध्दतीने करणे.

**१०.२ विहित कागदपत्रे/प्रमाणपत्रे अपलोड करणे :-**

**(एक)** प्रोफाईलद्वारे केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने उमेदवारांची पात्रता आजमावल्यानंतर (Check eligibility) उमेदवार जाहिरातीनुसार पात्र ठरत असल्यास अर्ज सादर करताना खालील कागदपत्रे/प्रमाणपत्रे (लागू असलेली) अपलोड करणे अनिवार्य आहे :-

| अ. क्र. | प्रमाणपत्र/कागदपत्र | फाईल फॉर्मेट | किमान फाईल साईज (KB) | कमाल फाईल साईज (KB) |
|---|---|---|---|---|
| १ | अर्जातील नावाचा पुरावा (एस.एस.सी. अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता) | PDF | ५० | ५०० |
| २ | शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ३ | सामाजिकदृष्टया मागासवर्गीय असल्याबाबतचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ४ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा वैध पुरावा**(सन २०२५-२६)** | PDF | ५० | ५०० |
| ५ | वैध नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र **(सन २०२५-२६)** | PDF | ५० | ५०० |
| ६ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र आणि वैश्विक ओळखपत्र (UDID Card) किंवा वैश्विक ओळखपत्रासाठीचा नाव नोंदणी क्रमांक (Enrolment Number) | PDF | ५० | ५०० |
| ७ | एस.एस.सी. नावात बदल झाल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ८ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ९ | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन | PDF | ५० | ५०० |
| १० | विभागाने प्रमाणित केलेले अनुभवाचे प्रमाणपत्र (जाहिरातीसोबतचे विवरणपत्र - १) | PDF | ५० | ५०० |

**(दोन)** उपरोक्त प्रमाणपत्र/कागदपत्रे आयोगाच्या संकेतस्थळावरील 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' प्रकरण क्रमांक चार तसेच प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे असणे अनिवार्य आहे.

**(तीन)** उमेदवार जाहिरातीनुसार पात्र ठरत असल्यास अर्ज सादर करताना शैक्षणिक अर्हतेसह अनुभवासंदर्भात सोबतच्या विवरणपत्र - १ मधील विहित नमुन्यात सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत अपलोड करणे अनिवार्य आहे.

**(चार)** पात्रतेसंदर्भातील विविध दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड केल्याशिवाय अर्ज सादर करता येणार नाही.

**(पाच)** शारीरिक चाचणी/प्रमाणपत्र तपासणीच्यावेळी पात्रतेसंदर्भातील सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

**(सहा)** पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे तपासणीच्या वेळी सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.

**१०.३. प्रमाणपत्र पडताळणी :-**

**१०.३.१** लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे शिफारस पात्र ठरणा-या उमेदवारांची प्रमाणपत्र पडताळणी संबंधित विभागाकडून निश्चित करण्यात येणाऱ्या ठिकाणी व वेळेस करण्यात येईल.

१०.३.२ आयोगाने निश्चित केलेल्या किमान सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची पात्रता, जाहिरातीमधील अर्हता/अटी व शर्तीनुसार त्यांनी अर्जामध्ये केलेल्या दाव्यांच्या आधारे तपासली जाईल.

१०.३.३ शिफारसपात्र ठरणाऱ्या व अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणा-या उमेदवारांची प्रमाणपत्र पडताळणी संबंधित विभागाकडून केली जाईल.

१०.३.४ विहित कागदपत्रे सादर करू न शकणा-या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच त्याकरिता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

**१०.४ सर्वसाधारण** :-

**(एक)** अर्ज फक्त आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे स्वीकारण्यात येतील.

**(दोन)** अर्ज सादर करण्याकरीता संकेतस्थळ :- https://mpsconline.gov.in

**(तीन)** अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mpsconline.gov.in तसेच https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**(चार)** आयोगास अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**१०.५ परीक्षा शुल्काचा भरणा:-**

**१०.५.१ परीक्षा शुल्क (रुपये) :**

**(एक)** अमागास - **रु. ७१९/-**

**(दोन)** मागासवर्गीय/आ.दु.घ./अनाथ/दिव्यांग - **रु. ४४९/-**

**(तीन)** उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.

**(चार)** परीक्षा शुल्क ना-परतावा (Non-refundable) आहे.

**१०.५.२** अर्ज सादरीकरणाचे टप्पे पूर्ण झाल्यावर उपलब्ध होणाऱ्या 'Submit and Pay fees' या बटनवर क्लिक केल्यानंतर किंवा मुख पृष्ठावरील 'माझे खाते' या सदराखालील अर्ज केलेल्या पदांच्या यादीतील 'Fees not Paid' अशी सद्यस्थिती लिहिलेल्या जाहिरात/पद/परीक्षेसमोरील ' Pay Now' या लिंकवर क्लिक करुन परीक्षा शुल्काचा भरणा करता येईल.

**१०.५.३** परीक्षा शुल्काचा भरणा खालील दोन पध्दतीने करता येईल:-

(एक) **ऑनलाईन पध्दतीने** :-

(१) भारतीय स्टेट बँक तसेच प्रणालीद्वारे उपलब्ध करून दिलेल्या कोणत्याही एका पेमेंट गेटवेच्या माध्यमातून क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगद्वारे परीक्षा शुल्क अदा करता येईल.

(२) परीक्षा शुल्काचा भरणा करताना बँक खात्यामधून परीक्षा शुल्काच्या रकमेची वजावट झाल्यावर परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वीपणे झाला (Payment Successful) असल्याचा संदेश आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या पृष्ठावर प्रदर्शित झाल्याशिवाय व परीक्षा शुल्काची पावती तयार झाल्याशिवाय संकेतस्थळावरील संबंधित पृष्ठावरून आणि/अथवा खात्यातून लॉगआऊट होऊ नये.

(३) परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी झाला आहे किंवा कसे, याची स्थिती (status)लगेचच अवगत होईल. खात्यातून Logout होण्यापूर्वी परीक्षा शुल्क यशस्वीपणे भरले असल्याबाबत व बँकेकडून व्यवहार (Transaction) पूर्ण झाला असल्याबाबत खात्री करण्याची जबाबदारी उमेदवाराची आहे.

(४) कोणत्याही कारणामुळे विहित कालावधीत ऑनलाईन पद्धतीने परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वीपणे करणे शक्य न झाल्यास अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकानंतर दोन दिवसापर्यंत परीक्षाशुल्काचा भरणा ऑफलाईन पद्धतीने करण्याकरीता चलनाची प्रत घेता येईल.

(दोन) **ऑफलाईन पध्दतीने** :-चलनाद्वारे

चलनाद्वारे परीक्षा शुल्काचा भरणा करण्याचा विकल्प निवडल्यास उपलब्ध होणारी चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत बँकेच्या कार्यालयीन वेळेत विहित अंतिम दिनांकापूर्वी परीक्षा शुल्काचा भरणा करता येईल. तथापि, चलनाची प्रत घेणे व बँकेत शुल्क जमा करणे, यामध्ये किमान तीन तासांचा कालावधी राहील, याची दक्षता घ्यावी.

**१०.५.४** परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी न झाल्यास पुन्हा शुल्क भरण्याची अथवा चलन घेण्याबाबतची कार्यवाही प्रस्तुत जाहिरातीच्या/अधिसूचनेच्या अनुषंगाने विहित दिनांकापूर्वीच करणे आवश्यक आहे. कोणत्याही कारणास्तव व्यवहार अयशस्वी ठरल्यास यासंदर्भातील तक्रारीची आयोगाकडून दखल घेतली जाणार नाही.

**१०.५.५** विहित मुदतीत परीक्षा शुल्काचा भरणा करु न शकलेल्या उमेदवारांचा संबंधित भरतीप्रक्रियेकरीता विचार केला जाणार नाही. यासंदर्भात आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचनांमधील संबंधित तरतुदींचे अवलोकन करणे उमेदवारांच्या हिताचे राहील.

**१०.६ सर्वसाधारण** :-

**१०.६.१** अर्ज सादर करतानाच उमेदवाराने स्वत:चा सेवार्थ आयडी अचूकपणे नमूद करणे अनिवार्य आहे.

**१०.६.२** ऑनलाईन पध्दतीने आयोगास सादर केलेल्या अर्जाच्या प्रतीसह अर्ज केल्याबाबतची माहिती उमेदवारांनी स्वत: आपल्या विभाग/कार्यालय प्रमुखांना कळविणे आवश्यक आहे.

**१०.६.३** प्रस्तुत परीक्षेकरीता अर्ज विचारात घेण्यास विभाग/कार्यालय प्रमुखांना कोणताही आक्षेप असल्यास तसे विभाग/कार्यालय प्रमुखांनी अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत आयोगास कळविणे आवश्यक आहे. तसेच परीक्षेकरीता अर्ज विचारात घेण्यास हरकत नसल्यास आयोगास तसे कळविण्याची आवश्यकता नाही; असेही उमेदवारांनी संबंधित विभाग/कार्यालय प्रमुखांना कळवावे.

**१०.६.४**प्रस्तुत परीक्षा ही स्पर्धा परीक्षा असून पदोन्नतीसाठी पात्रता परीक्षा (Qualifying Examination) नाही. परीक्षेच्या निकालाच्या आधारे आयोगाकडून शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांची पात्रता सक्षम प्राधिका-याकडून तपासण्याच्या अधीन राहून नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्यात येईल. सदर परीक्षेमधील उमेदवारांच्या कामगिरीच्या (Performance) आधारे नियुक्ती मागण्याचा उमेदवारास कोणताही हक्क असणार नाही.

**१०.६.५** परीक्षेस अर्ज सादर केल्यानंतर अथवा परीक्षा दिल्यानंतर उमेदवाराने राजीनामा दिल्यास अथवा कोणत्याही कारणास्तव नोकरी सोडल्यास अथवा विभागाने सेवा समाप्त केल्यास अथवा धारणाधिकार न ठेवता संवर्गबाह्य पदावर नेमणूक झाल्यास सदर परीक्षेच्या निकालाच्या आधारे संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी पात्र असणार नाही.

**१०.६.६** अर्जामध्ये नमूद केलेल्या माहितीच्या आधारे जाहिरातीमधील विहित अर्हतेबाबतच्या अटींची पूर्तता करतात असे समजून पात्रता न तपासता आयोगाकडून उमेदवारांना तात्पुरता प्रवेश दिला जाईल. परंतु परीक्षेपूर्वी अथवा परीक्षेनंतर कोणत्याही टप्प्यावर, उमेदवाराने अर्जात नमूद केलेली माहिती चुकीची वा खोटी असल्याचे अथवा उमेदवार विहित अर्हतेची पूर्तता करीत नसल्याचे आयोगास आढळल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि त्याबाबतचा आयोगाचा निर्णय अंतिम राहिल.

**११. प्रवेशप्रमाणपत्र :-**

**११.१** परीक्षेस प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेशप्रमाणपत्रे आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळावर (https://mpsconline.gov.in) उमेदवारांच्या प्रोफाईलद्वारे परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे ७ दिवस अगोदर उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**११.२** परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वत:चे प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**११.३** प्रवेश प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यात आल्यानंतर उमेदवाराला त्याच्या आयोगाकडील नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे कळविण्यात येईल. याबाबतची घोषणा आयोगाच्या संकेतस्थळावर परीक्षेपूर्वी एक सप्ताह अगोदर प्रसिद्ध करण्यात येईल.

**११.४** परीक्षेच्या दिनांकापूर्वी ३ दिवस अगोदर प्रवेश प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास अर्ज सादर केल्याच्या आवश्यक पुराव्यासह आयोगाच्या कार्यालयाकडे संपर्क साधावा.

**११.५** परीक्षेच्यावेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड किंवा फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसेन्स यापैकी किमान कोणतेही **एक मूळ ओळखपत्र** तसेच मूळ ओळखपत्राची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

**११.६** आधार कार्डच्या ऐवजी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड केलेले ई-आधार सादर करणा-या उमेदवारांच्या बाबतीत ई-आधार वर उमेदवाराचे नाव, पत्ता, लिंग, फोटो, जन्मदिनांक या तपशीलासह आधार निर्मितीचा दिनांक (Date of Aadhaar generation) व आधार डाऊनलोड केल्याचा दिनांक असल्यासच तसेच सुस्पष्ट फोटोसह **रंगीत प्रिंट** मध्ये आधार डाऊनलोड केले असल्यासच ई-आधार वैध मानण्यात येईल.

**११.७** नावांमध्ये बदल केलेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला (विवाहित स्त्रियांच्या बाबतीत), नावांत बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नावांत बदल झाल्यासंबंधीचा दाखला व त्याची छायांकित प्रत परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१२. सेवाप्रवेशोत्तर शर्ती :-**

**१२.१** नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील अर्हता/परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील :-

**(एक)**जेथे प्रचलित नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा.

**(दोन)**हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा.

**(तीन)** शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान(सा.प्र.वि.), क्रमांक: मातंसं-२०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ०४ फेब्रुवारी, २०१३, शासन पूरकपत्र, क्रमांक मातंसं-२०१२/प्रक्र.२७७/३९, दिनांक ०८ जानेवारी, २०१८ व १६ जुलै, २०१८ अथवा महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने यासंदर्भात वेळोवेळी विहित केलेली संगणक हाताळणीबाबतची प्रमाणपत्र परीक्षा.

**(चार)** जवान-नि-वाहनचालकांना संगणक अर्हता परीक्षा लागू नाही. तथापि अशा उमेदवारांची दुय्यम निरीक्षक पदावर निवड ल्यानंतर त्यांनी नियमानुसार संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

**१२.२** दुय्यम निरीक्षक पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तिस, आयुक्त वेळोवेळी विनिर्दिष्ट करतील अशा कालावधीचे, स्वरुपात आणि त्याठिकाणी शारीरिक प्रशिक्षण व आसवनी प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. या प्रशिक्षणामध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागाने अंमलबजावणी केलेल्या कायद्यांचा अभ्यास आणि त्या कायद्यांमध्ये विहित केलेली राज्य उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांची कार्य आणि कर्तव्याबाबतच्या तरतुदींचा समावेश असेल.

**१३.** प्रस्तुत अधिसूचनेमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, अर्जासोबत सादर करण्यावयाची कागदपत्रे इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ' **उमेदवारांकरीता माहिती,** विविध विभाग/उपविभागांमध्ये (Menu/Sub-menu) वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचना, परिपत्रके इत्यादी तसेच "**परीक्षा योजना**" विभागातील **"दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क विभाग, गट-क, मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा "** मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व अधिसूचना अधिकृत समजण्यात येईल.

**१४.** प्रस्तुत परीक्षेच्या आयोजनाच्या दिनांकास अन्य संस्थेची परीक्षा असल्यास उमेदवारास कोणती परीक्षा द्यावयाची आहे; याबाबतचा निर्णय उमेदवाराने स्वत: घेणे आवश्यक राहील.

**१५.** पदभरतीसंदर्भात काही अनुचित प्रकार घडल्यास महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मार्गास प्रतिबंध) अधिनियम, २०२४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून कार्यवाही करण्यात येईल.

**१६.** सदर अधिसूचना आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ठिकाण : नवी मुंबई.
दिनांक : ०९ जून, २०२५

उप सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

## विवरणपत्र - १

**फक्त राज्य उत्पादन शुल्क विभागातील लिपिक संवर्ग व जवान संवर्गातील कर्मचाऱ्यांकरीता असलेली दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट-क, मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेकरीता आस्थापना अधिकारी किंवा कार्यालय/ विभागप्रमुख अधिकारी यांनी द्यावयाचे**

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की खाली नमूद उमेदवारांसंदर्भात अर्जामध्ये दिलेली नियमित नियुक्तीसंबंधीची माहिती व खाली नमूद केलेली माहिती कार्यालयातील नोंदीवरून तपासण्यात आली :- (खालीलपैकी लागू असलेल्या चौकटीत √ अशी खूण करावी.)

१. उमेदवाराचे संपूर्ण नाव :- ..........................................................................................................

२. उमेदवाराचा जन्म दिनांक :- [ ][ ] [ ][ ] [ ][ ][ ][ ]

३. शैक्षणिक अर्हता :-..........................................................................................................

४. अर्जदार राज्य उत्पादन शुल्क विभागामध्ये लिपिक संवर्गामध्ये आहे काय? :- होय / नाही

५. अर्जदार राज्य उत्पादन शुल्क विभागामध्ये जवान संवर्गामध्ये आहे काय? :- होय / नाही

६. राज्य उत्पादन शुल्क विभागामध्ये **लिपिक संवर्ग** (लिपिक,वरिष्ठ लिपिक, लिपिक – टंकलेखक, टंकलेखक, लेखापाल व टिप्पणी सहायक) अथवा **जवान संवर्ग** (जवान, जवान-नि-वाहनचालक, पेटी ऑफिसर, सहायक दुय्यम निरीक्षक) यापैकी लागू असेल त्याप्रमाणे नियुक्तीचे पद व नियमित नियुक्तीचा दिनांक :-

(१) **नियुक्तीचे पद लिपिक संवर्गातील असल्यास नियमित नियुक्तीचा दिनांक** - [ ][ ] [ ][ ] [ ][ ][ ][ ]

(२) **नियुक्तीचे पद जवान संवर्गातील असल्यास नियमित नियुक्तीचा दिनांक** - [ ][ ] [ ][ ] [ ][ ][ ][ ]

७. लिपिक संवर्ग अथवा जवान संवर्गामध्ये शासन परिपत्रकानुसार विहित दिनांकास झालेली एकूण नियमित सेवा :- [ ][ ] वर्षे [ ][ ] महिने [ ][ ] दिवस

८ . **लिपिक संवर्गाच्या उमेदवारांकरीता -** सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा उत्तीर्ण झाला असल्यास उत्तीर्ण झाल्याचा दिनांक अथवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाल्याचा दिनांक :- [ ][ ] [ ][ ] [ ][ ][ ][ ]

**९. सामाजिक प्रवर्गाचा तपशील :-**

| ९.१ सामाजिक प्रवर्ग :- | अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | सा. आणि शै. मागास वर्ग | अराखीव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |

९.२ जात प्रमाणपत्राची पडताळणी झाली आहे काय ? :- होय / नाही

९.३ नसल्यास जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी प्रलंबित असल्याची कारणे :-..........................................................................................................

**१०. सेवा तपशील :-**

१०.१ उमेदवाराविरुद्ध विभागीय चौकशी प्रलंबित/प्रस्तावित आहे काय? :- होय / नाही

१०.२ विभागीय चौकशी प्रलंबित/प्रस्तावित असल्यास त्याची संक्षिप्त माहिती :-..........................................................................................................

१०.३ उमेदवाराविरुद्ध फौजदारी खटला होऊन शिक्षा झाली आहे काय? :- होय / नाही

१०.४ फौजदारी खटला प्रलंबित आहे काय? :- होय / नाही

१०.५ फौजदारी खटला होऊन शिक्षा झाली असल्यास /खटला प्रलंबित असल्यास त्याबाबतचा तपशील :-..........................................................................................................

१०.६ संबंधित विभागाच्या सेवेत असताना झालेल्या शिक्षेचा तपशील :-..........................................................................................................

१०.७ उमेदवाराचा गोपनीय अभिलेख समाधानकारक आहे काय? :- होय / नाही

१०.८ तो/ती दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट-क पदावर नियुक्ती देण्यास पात्र आहे काय? :- होय / नाही

१०.९ **लिपिक संवर्गातील उमेदवारांकरीता -** विहीत संगणक प्रशिक्षण पूर्ण केले आहे काय - होय / नाही

**प्रमाणित करण्यात येते की, सदर उमेदवार सेवाप्रवेश नियमानुसार व संबंधित जाहिरातीनुसार सर्व अटींची पूर्तता करीत असून, प्रस्तुत परीक्षेस पात्र आहे. वरील नोंदी संबंधित कागदपत्रांवरुन व मूळ प्रमाणपत्रावरून तपासण्यात आल्या आहेत.**

**दिनांक :-**

**ठिकाण :-**

**आस्थापना अधिकारी किंवा कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख यांची सही व पदनामाचा शिक्का**